महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४००००१, दू.०२२-२२६२०२३१/३२,
Website-www.doa.maharashtra.gov.in Email ID: directorateofart@gmail.com

---

**दिनांक:-२१ ऑक्टोबर, २०२४**

# प्रसिध्दीपत्रक

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रमास ऑफलाईन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरणेबाबत

--------

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता १ वर्ष, २ वर्षे व ४ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य् अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया दिनांक १ जून, २०२४ ते ३० जून, २०२४ या कालावधीत संचालनालयाच्या स्तरावरुन ऑनलाईन राबविण्यात आली आहे.

संचालनालयाच्या स्तरावरुन ऑनलाईन स्वरुपात झालेली प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरही प्रथम वर्ष प्रवेशाच्या जागा रिक्त असल्यास, दिनांक १ जून, २०२४ ते ३० जून, २०२४ या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचीच रिक्त जागांवर शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार दिनांक १८ जुलै, २०२४ ते ३१ जुलै, २०२४ या कालावधीमध्ये संस्था स्तरावर ऑफलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणेबाबत या संचालनालयाचे दिनांक १६ जुलै, २०२४ प्रसिध्दीपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही प्रथम वर्ष प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्यास ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अर्ज सादर केला नाही, अशा विद्यार्थ्यांना शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार ऑफलाईन पध्दतीने दिनांक १ ऑगस्ट, २०२४ ते ५ ऑगस्ट, २०२४ या कावधीमध्ये प्रवेश देण्याबाबत या संचालनालयाचे दिनांक १६ जुलै, २०२४ प्रसिध्दीपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

वरील दिनांक १८ जुलै, २०२४ ते ३१ जुलै, २०२४ तसेच १ ऑगस्ट, २०२४ ते ५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत झालेल्या प्रवेशाची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी बी.एफ.ए. राज्य सामाईक प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या कॅप राऊंडनंतर ऑनलाईन लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर लिंकवरुन विहित कालावधीत विद्यार्थी प्रवेशाच्या ऑनलाईन नोंदी करण्यात याव्यात, याबाबत या संचालनालयाचे दिनांक १६ जुलै, २०२४ प्रसिध्दीपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

उक्त बाब लक्षात घेता, दिनांक १८ जुलै, २०२४ ते ३१ जुलै, २०२४ तसेच १ ऑगस्ट, २०२४ ते ५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत झालेल्या प्रवेशाची ऑनलाईन नोंदणी https://doaonline.co.in/FA२०२४ या लिंकवर **दिनांक २३ ऑक्टोबर, २०२४ ते २६ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीमध्ये करण्यात यावी.**

ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केला नाही, अशा विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन त्यांचे ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

**ज्या परिसंस्था उक्त कालावधीत ऑफलाईन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन भरणार नाहीत, अशा परिसंस्थांचे ऑफलाईन पध्दतीचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच, ज्या विद्यार्थ्यांची प्रवेशाची ऑनलाईन नोंदणी होईल, अशाच विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रविष्ठ होता येईल, याची सर्व प्राचार्य व कला परिसंस्थांनी नोंद घ्यावी.**

स्वाक्षरी/-
(संदीप डोंगरे)
प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

स्वाक्षरी/-
(डॉ.संतोष क्षीरसागर)
प्र.कला संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई